FIR प्रत मिळाली

I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station सा.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. 17 वर्ष Year 2023 दिनांक Date 13.04.2023

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988 कलमे Sections 7 अन्वये
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........ तारीख पासून Date from 01/04/23 वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to 12/04/23 वेळ Time 16:15 वाजेपर्यंत

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date 05/04/2023 वेळ Time 10:00

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02/2023 तारीख Date 13/04/2023 वेळ Time 01:05

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी तक्रार अर्ज लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ........ ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road
Address of Occurrence Name ........ गंगा वडापाव सेंटर समोर, ठाणे रेल्वे स्टेशन समोर
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place आनंद सिनेमा ........ गाव Village आवारात पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ठाणे राज्य State महाराष्ट्र.
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name डॉ. श्रद्धा नानाजी निकम-मोहिते (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name नानाजी निकम
(c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age 37 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ........
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation डॉक्टर.
(g) धर्म Religion हिंदू ........ जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address : 504/G विंग Ward सर्वे नं. ........ तुळशी नाव नंबर House/Name No. आशन ........ फोन /मो. नंबर Phone/M. No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........
रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place भारत पेट्रोलपंप समोर गाव Village ........ पोस्ट Post खरवई पो. स्टे. P. Stn. बदलापूर (पूर्व)
तालुका Taluka अंबरनाथ जिल्हा Distt. ठाणे राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

राहुल पोपटराव आहिरे वय-40 वर्षे, पद- कनिष्ठ संरक्षण अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, आर.सी. चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई-80. रा.ठी. विमनगर, सर्वोदय हॉस्पिटलच्या पाठीमागे, सिद्धनाथ मं... जवळ घाटकोपर (पूर्व) मुंबई-80.

फिर्यादी डॉ. श्रध्दा तानाजी कलिकम-मोहिते वय-३७ वर्षे व्यवसाय डॉक्टर, रा. सी. G/504, तुळशी आश्रम, नायरा पेट्रोलपंप समोर, खरवई बदलापूर (पुर्व) जि. ठाणे यांचा सविस्तर जबाब मराठीत संगणीकृत करण्यात आला असुन तो सोबत जोडण्यात आलेला आहे. हिच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात यावी.

समक्ष

(अजित ओकुर्णे)

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे.

फिर्याद दि. १३/०४/२०२३.

मी डॉ. श्रध्दा तानाजी निकम–मोहिते, वय ३७ वर्षे, धंदा –डॉक्टर, रा.ठि. ५०४/जी, तुलसी आहान, नायरा पेट्रोलपंपासमोर, बदलापूर (पू), खरवई, जि. ठाणे, मोबाईल नं. ९८६९३९७६२८.

---

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर मागील ०८ महिन्यापासून माझी मुलगी कुमारी आस्था वय ०५ वर्ष हिच्या सोबत राहावयास आहे. मी आयुर्वेद म्हणून डॉक्टरची पदवी घेतली असून त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविते.

माझे दिनांक २२ मार्च २०१४ रोजी श्री. भूषण गोविंद मोहिते यांच्या सोबत हिंदू धार्मिक विधीनुसार लग्न झाले आहे. सन २०१५ ते २०२२ मध्ये मी, माझे पती भुषण मोहीते व मुलगी आस्था सोबत सिंगापूर या देशात कामानिमीत्त राहवयास होते. त्यावेळी आम्ही वर्षातून ०१ ते ०२ वेळा भारतात येत असत. सन २०२२ मधील फेब्रुवारी मध्ये सासु–सासरे आजारी असल्याने मी व माझे पती भारतात परत आलो. त्यावेळी आम्ही सर्वजन माझे सासऱ्याच्या नावे असलेल्या रुम न. ५०४, बिल्डीग न.०९, पार्थ को. ऑ. हौ. सोसायटी, मिलीनियम पार्क, हरिओमनगर, मुलुंड (पू) मुंबई – ८१ येथे राहत होतो. परंतु २२ जुलै २०२२ रोजी माझे पती श्री भुषण काहीही न सांगता कामानिमीत्त परस्पर सिंगापूर येथे निघुन गेले.

त्यानंतर माझे सासू–सासऱ्यानी मला त्रास देण्यास सुरूवात केली व मला घराबाहेर जाण्यास सांगू लागले. त्यांच्या रोजच्या बोलण्याला कंटाळून मी वर नमूद बदलापूर येथील निवासस्थानी मुलीला घेऊन ऑगस्ट २०२२ पासून राहण्यास सुरूवात केली. अचानक उध्दभवलेल्या परिस्थीतीमुळे मला माझा व मुलीचा खर्च करणे परवडत नव्हते. त्यामुळे मी माझे पती श्री. भूषण यांना देखील त्याबाबत अवगत केले परंतु त्यांनी कोणतीही मदत केली नाही. त्यामुळे मी माझे पती श्री. भूषण यांच्या विरूध्द उल्हासनगर कोर्टात घरगुती हिसांचार Case No. MHTH130046122022 सप्टेंबर २०२२ व पोटगीसाठी CRPC १२५ प्रमाणे Case No. MHTH130069382022 अन्वये नोव्हेंबर २०२२ मध्ये Case दाखल केली आहे.

नोव्हेंबर २०२२ मध्ये मला ८८७९१३९४७७ या क्रमांकावरून फोन आला त्यावेळी त्यांनी त्यांचे नाव राहुल आहिरे असे सांगून ते मुलुंड परिसरातील महिला बाल विकास विभागातील संरक्षण अधिकारी असून मी दाखल केलेल्या DV Case मधील ६ वे न्यायालय, उल्हासनगर कोर्टाचे समन्स प्राप्त झाले असून ते बजावत असल्याचे सांगितले. त्यानंतर २३ जानेवारी २०२३ रोजी अंबरनाथ येथील महिला बाल विकास विभागाचे संरक्षण अधिकारी कार्यालयात जाऊन जबाब नोंद करून माझ्या केसमधील समन्स ताब्यात घेऊन श्री. राहुल आहिरे यांना कॉल करून त्यांच्यासह माझ्या पतीना बजावले.

माझ्या पोटगीच्या केसमधील समन्स बजावणीसाठी माझ्या वकिलानी समन्स माझ्या ताब्यात दिले त्यामुळे मी पुन्हा मुलुंड विभागातील संरक्षण अधिकारी श्री. राहुल आहिरे यांना समन्स बजावणीसाठी दि. ०१/०४/२०२३ रोजी कॉल केला असता त्यांनी रु १०००/– सर्व्हिस चार्ज लागेल तरच समन्स बजावणी करेल असे बोलले. त्यामुळे श्री. राहुल आहिरे हे माझ्याकडे लाचेची मागणी करत असल्याचे माझ्या लक्षात आले परंतु माझी त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांचे विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ०५/०४/२०२३ रोजी समक्ष येवून लेखी तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता ला.प्र.विभागाकडून पो.नि. अजित झांजुर्णे व पर्यवक्षक अधिकारी सपोआ संजू जॉन यांना नेमण्यात आले. त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी दोन शासकीय पंचाना पाचारण करून त्यांनी ओळख करून दिली. दोन्ही शासकीय पंचाना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. तो त्यांनी वाचून त्यावरी दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून पो.नि. झांजुर्णे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला

त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पंचांसमक्ष मोबाईल फोनवर भेटीचे ठिकाण व वेळ निश्चित करण्याकरीता माझे मोबाईल क्र. ९८६९३९७६२८ यावरुन महिला बाल विकास विभागाचे संरक्षण अधिकारी राहूल आहिरे यांचे मोबाईल क्रमांक ८८७९१३९४७७ यावर फोन करण्यात येणार असून आमच्यात होणारे संभाषण रेकॉर्ड केले जाणार असल्याचे सागून त्यानंतर समक्ष भेटून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सागितले. त्यानंतर पो.नि. झांजुर्णे हे मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. झांजुर्णे यांनी स्वत:चे, माझे, व पंचाचे वक्तव्य रेकॉर्डीग केले. त्यानंतर माझे मोबाईल स्पिकर चालू करुन मुलुंड विभागाचे संरक्षण अधिकारी श्री. राहूल आहिरे यांना कॉल केला असता त्यांनी कामाचा लोड जास्त असल्याने भेटता येणार नाही असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना चार–पाच वाजता भेटता येईल का अशी विचारणा केली असता त्यांनी तसा फोन करेन असे सांगितले. पो.नि. झांजुर्णे यांचे आदेशान्वये पुन्हा दुपारी १५.२० वा. सुमारास फोन केला असता त्यांनी आज भेटता येणार नसून यापुर्वी भेटलेल्या ठिकाणी भेटू त्यासाठी मी उद्या १२ वाजता नंतर फोन करेन असे सांगितले. माझेमध्ये व श्री. राहूल आहिरे यांनेत झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले. तसेच त्याचा पंचनामा करण्यात

आला. त्यानंतर मी दुसऱ्या दिवशी राहूल आहिरे यांना फोन केला परंतु त्यांना वेळ नसल्याने भेट होणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी अधून मधून त्यांना भेटण्यासाठी कॉल केला परंतू त्यांनी भेटीची निश्चित वेळ दिली नाही.

दिनांक ११/०४/२०२३ रोजी मी राहूल आहिरे यांना फोन केला, त्यावेळी त्यांनी दिनांक १२/०४/२०२३ रोजी दुपारी २ वाचे दरम्यान यापुर्वी भेटलेल्या ठिकाणी ठाणे पुर्व येथे स्टेशनच्या बाहेर भेटू असे सांगितले. तसे मी पो.नि. झांजुर्णे यांना फोन करुन कळविले व माझे मुलीची परिक्षा सुरु असल्याने मी परस्पर दुपारी १ पर्यंत ठाणे पुर्व स्टेशनचे बाहेर डायरेक्ट येते असे पो.नि. झांजुर्णे यांना कळविले.

दिनांक १२/०४/२०२३ रोजी राहूल आहिरे हे नक्की किती वाजता भेटणार याकरीता मी माझा मोबाईल क्रमांक ९८६९३९७६२८ वरून संरक्षण अधिकारी श्री. राहूल आहिरे मोबाईल क्रमांक ८८७९१३९४७७ वर फोन केला असता त्यांनी दुपारनंतर भेटणार असल्याचे सांगितले.

पो.नि. झांजुर्णे यांचे सुचनेप्रमाणे आज दि. १२/०४/२०२३ रोजी मी ठाणे पुर्व रेल्वे स्टेशनचे बाहेर आनंद सिनेमा येथील जंबो किंग वडापाव समोर १४:०५ वाजताचे सुमारास पोहचले. माझ्या अगोदरच पो.नि. झांजुर्णे व सपोआ श्री. चौगुले व सापळापथक हजर होते. सदरवेळी पो.नि. झांजुर्णे यांनी मला सांगितले की, यापुर्वीचे पर्यवेक्षक अधिकारी स.पो.आ. संजू जॉन यांची बदली झाल्याने त्यांचे जागेवर सपोआ श्री. चौगुले हे पर्यवेक्षक अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचे सांगून ओळख करुन दिली. त्यानंतर मी पो.नि. झांजुर्णे व सपोआ चौगुले यांच्यासह आनंद सिनेमाजवळच असणाऱ्या कॅनरा बँके, कोपरी शाखा येथे उभ्या असलेल्या शासकीय वाहनाजवळ गेली. त्यावेळी तेथे पंच व पडताळणी/सापळा पथक हजर होते त्यांचीही पो.नि. झांजुर्णे यांनी ओळख करुन दिली.

त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांच्या सुचनेनंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. झांजुर्णे यांनी स्वतःचे, माझे, व पंचाचे वक्तव्य शासकिय वाहनात रेकॉर्डीग केले. त्यांनतर मी माझा मोबाईल क्रमांक ९८६९३९७६२८ वरून संरक्षण अधिकारी श्री. राहूल आहिरे यांचा मोबाईल क्रमांक ८८७९१३९४७७ वर मोबाईल स्पिकर चालू करुन कॉल केला. त्यावेळी मी सरंक्षण अधिकारी श्री. राहूल आहिरे यांना असे नमुद केले की, ' सर तुम्ही सकाळी सर्व्हिस चार्जचा बोलला होता.' त्यावर त्यांनी असे नमुद केले की, ' तीन वेळा गेलो आपण, तीन वेळा पैकी तुम्ही मला एका वेळेस पे केल नाही आता तुम्हीच बघा किती करायच' त्यावर मी असे नमुद केले की, बरोबर हाय पण तुम्ही एक जर आयडीया दिली तर बर होईल' त्यावर लोकसेवक राहुल आहिरे यांनी असे नमुद केले की, बर थाऊजन रूपीज पाहू' त्यावर मी असे नमुद केले की, ' थोड फार बघा ना काय कमी झाल तर त्यावर लोकसेवक राहुल आहिरे यांनी दोनशे रूपये कमी दया असे नमुद केले. त्यानंतर मी असे नमुद केले की, आठशे दयायचे का त्यानंतर लोकसेवक राहुल आहिरे यांनी 'हो' असे नमुद केले.

त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी संरक्षण अधिकारी राहुल आहिरे यांनी रु ८००/— इतक्या लाचेची मागणी केले असल्याची खात्री झाल्याने लागलीच सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यांनतर मला सापळापूर्व/सापळा कारवाई बाबतची माहिती समजावून सांगितली व मला कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी मला लोकसेवक राहुल आहिरे यांना दयावयाचे रु ८००/— (अक्षरी रु आठशे फक्त ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझेकडील बचतीतील भारतीय चलनाच्या रु ५००/— दराची ०१ नोट, रु २००/— दराची ०१ नोट, रु १००/— दराची ०१ नोट, असे एकुण रु ८००/— (अक्षरी रु आठशे फक्त ) त्यांचेकडे दिले. माझी महिला पचांसमक्ष महिला अंमलदार यांच्यामार्फतीने अंगझडती घेण्यात आली. माझ्या शर्ट व पॅन्टच्या खिसामध्ये तसेच माझ्या सोबत असलेल्या सॅग बॅगमध्ये मिळून आलेल्या वस्तू पाहुन पो.नि. झांजुर्णे यांनी सागितले कि सॅगचे पहीला कप्पा मोकळा सोडुन त्या वस्तु इतर कप्प्यात ठेव्याव्यात त्याप्रमाणे मी सदर वस्तु ठेवल्या. त्यावेळी मी पो.नि. झांजुर्णे व सपोआ चौगुले यांना असे सांगितले की, मागील वेळी जेव्हा मी समन्स बजावण्याकरीता त्यांना भेटली होती. त्यावेळी त्यांनी समन्सची बजावणी केल्यानंतरच सर्व्हिस चार्ज म्हणून रक्कम स्विकारली होती. तसेच समन्स बजावण्याकरीता ते मला त्यांच्या सोबत घेऊन गेले होते त्याप्रमाणे आज देखील असेच होईल असे सांगितले असता पो.नि. झांजुर्णे यांनी ते स्वतः पथकातील २ अंमलदारांसह त्यांचे रिक्षाचे पाठीमागे येतील असे सांगितले.

तद्नंतर पो.नि. झांजुर्णे यांनी सापळा पथकातील अमंलदाराच्या मदतीने कागदावर नमुद नोटाचे नंबर नोंद केले. नंतर नोटाच्या दोन्ही बाजूस चालक श्री. मोकल यांनी अ‍ॅथ्रेसिन पावडर लावून त्यांचे गुणधर्म सांगितले. त्यांनतर सदरच्या नोटा एका कागदामध्ये ठेवून सदर रक्कम माझ्या सॅग बॅगच्या समोरील कप्प्यामध्ये ठेवली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाईबाबत पो.नि. झांजुर्णे यांनी मला व पंचाना तसेच सापळा पथकातील अमंलदारांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाईचे आयोजन केले. तसेच लोकसेवक राहुल आहिरे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर पो. नि. झांजुर्णे यांनी माझ्या गळयामधील ओढणी उजव्या हाताने डाव्या खांदयावर ठेवावी असा इशारा करावा असे सांगितले. तसेच सापळा पथकातील अंमलदार कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने आनंद टॉकिजच्या आवारात उभे राहतील असे सांगितले.

दि. १२/०४/२०२३ रोजीची फिर्याद पुढे चालू.......................................

त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून महिला अमंलदार मौले यांच्या मदतीने माझ्या शर्टाच्या आतिल स्लीपला लावला. त्यानंतर मी व पंच श्रीमती हेमिता सुर्यवंशी असे लोकसेवक राहुल आहिरे यांना भेटण्याकरीता आनंद टॉकिजच्या आवारामधील जम्बो किंग वडापाव येथे गेलो. थोडया वेळाने तेथे लोकसेवक राहुल आहिरे आले. त्यानंतर मी, महीला पंच सुर्यवंशी व लोकसेवक आहिरे असे रिक्षामधून पार्थ को. ऑ. हौ. सोसायटी, मिलीनियम पार्क, हरिओमनगर, मुलुंड (पू) मुंबई या दिशेने गेलो. सदर ठिकाणी पोहचल्यानंतर मी व पंच सुर्यवंशी आम्ही दोघे बिल्डींगच्या खाली उभे राहिलो व लोकसेवक राहुल आहिरे हे माझ्या पतीचे घरी बिल्डीग न.०९, रुम न. ५०४ मध्ये गेले. काही वेळानंतर ते आम्ही उभे असलेल्या ठिकाणी आले असता त्यांनी सांगितले की, माझे पती घरी नाहीत, त्यांना संपर्क करुन त्यांनी सांगितलेप्रमाणे नमुद समन्स बिल्डीगच्या वॉचमनकडे दिले. त्यानंतर मी, पंच सुर्यवंशी व लोकसेवक आहिरे असे तीघे रिक्षाने पुन्हा ठाणे स्टेशनजवळील आनंद टॉकीजजवळ आलो. तेथे आल्यानंतर मी एटीएम मशीनमध्ये जाऊन येते असे लोकसेवक आहिरे यांना सांगितले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी जम्बो किंग वडापाव येथे थांबतो. मी लागलीच आनंद टॉकीजच्या आवारात असणाऱ्या एक्सीस बॅकेच्या एटीएममध्ये गेल्याचा बनाव केला. तो पर्यत लोकसेवक आहिरे व पंच हे आनंद टॉकीच्या आवारामधील जम्बो किंग वडापाव येथे थाबंले होते. मी पोहचल्यानंतर मी माझ्या सॅगमधून काढून लाचेची रक्कम लोकसेवक आहिरे यांच्या हातात दिली व त्यांनतर माझ्या गळयामधील ओढणी उजव्या हाताने डाव्या खांदयावर ठेवून पूर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी तात्काळ सापळा पथकातील अंमलदार नमुद ठिकाणी येऊन लोकसेवक राहूल आहिरे यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडून त्यांना जागीच अटकावून ठेवले.

त्यांनतर पो.नि. झांजुर्णे यांनी महिला अमंलदार मौले यांच्या मदतीने माझ्या शर्टाच्या आतील स्लीपला लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद केला. त्यानंतर लोकसेवक राहुल आहिरे यांना स्वत:ची ओळख पचासंमक्ष सांगितली. त्यानंतर त्यांनी मला लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी सांगितले की, सदरची रक्कम त्यांनी त्यांच्या पॅन्टीच्या पुढील बाजूच्या डाव्या खिश्यामधून ठेवली असल्याचे सांगितले. लोकसेवक राहुल आहिरे यांनी लाचेची मागणी केलेली रक्कम स्विकारली असल्याने नमुद पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

लोकसेवक राहुल आहिरे, कनिष्ठ संरक्षण अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मुलुंड विभाग यांनी मी दाखल केलेल्या पोटगी केस मधील ६ वे न्यायालय, उल्हासनगर कोर्टाचे समन्स बजावणीकरीता सर्व्हिस चार्ज म्हणुन रु १,०००/– लाचेची मागणी करून तडजोडी अंती रु ८००/– स्विकारण्याचे मान्य करून नमुद लाचेची रक्कम रु ८००/– आज रोजी माझे कडून स्विकारली म्हणून माझी लोकसेवक राहुल आहिरे, कनिष्ठ संरक्षण अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मुलुंड विभाग यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक राहुल आहिरे, कनिष्ठ संरक्षण अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मुलुंड विभाग यांचेशी कोणतेही पूर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचा व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( अजित रामराव झांजुर्णे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ सापळा.
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य ........ —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........ —
Unnatural / Accidental Death Case No.. if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे पती यांना मा. JMFC कोर्ट उल्हासनगर यांचे पोटगी संदर्भातील समन्स बजावणेकामी फिर्यादी यांना आरोपी यांनी संपर्क करून सदर समन्स बजावणी करून रिपोर्ट सादर करणे कामी आरोपी यांनी सर्विस चार्ज म्हणून फिर्यादीकडे रु. 1000/- (अक्षरी एक हजार) ची मागणी करून तडजोडी अंती रुपये 8.00/- (अक्षरी रुपये आठशे) स्विकारण्याचे मान्य केले. त्यामुळे सापळा कारवाई दरम्यान आरोपी यांना रुपये 8.00/- (अक्षरी आठशे मात्र) स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून कलम 7 भ्र. प्र. अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
अजित डांगुणे, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. मुंबई विभाग, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ........ अजित डांगुणे.
पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ........ ला.प्र.वि. मुंबई विभाग.
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 13/04/2023
1. Date and time of submitted to the Court.

2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**